# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा क्र.तंशिविकापु/विवि/२०१७-१८ ईबीसी व वसतिगृह/२०१८/ १०८६ दिनांक :- 18 MAY 2018

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांच्या सन २०१७-१८ मधील संस्था स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाची पडताळणी ..

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र १८/तंशिसं/ वि.का.पत्र /२०१८/१८८ दि १६/०५/२०१८ .

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की , शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता ज्या विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना करीता संस्थेमध्ये ऑनलाईन अर्ज केलेल्या परंतु संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित असलेल्या सर्व अर्जाची संस्थानी संस्थेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पध्दतीने **त्वरीत** पडताळणी (अर्ज मंजुर अथवा नामंजुर) करावी. अर्ज नामंजुर केला असल्यास त्याबाबतचे कारण स्पष्टपणे नमूद करावे. तसेच, संस्थास्तरावर मंजूर केलेले अर्ज मूळ कागदपत्र / प्रमाणपत्रांसह सादर करुन,या विभागीय कार्यालयाकडून **दिनांक २५/०५/२०१८ पर्यंत** मंजुर करुन घ्यावेत.

**दिनांक २५/०५/२०१८ नंतर संस्थेतील अर्ज पडताळणी साठी प्रलंबित राहील्यास असे अर्ज विभागीय कार्यालयाकडून रद्द करण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील यांची नोंद घ्यावी.**

त्याच प्रमाणे सन २०१७-१८ करीता १) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोनही योजनांकरीता विहीत मुदतीमध्ये ऑन लाईन अर्ज न केलेल्या पात्र विद्यार्थ्यांची तपशीलवार यादी आवश्यक माहितीसह (संस्थेचे नाव, संस्था क्रमांक, विद्यार्थ्याचे नाव, ॲप्लीकेशन आयडी, अर्ज केलेल्या योजनेचे नाव व अभिप्राय इंत्यादी ) दिनांक २५/०५/२०१८ पूर्वी विभागीय कार्यालयामध्ये हस्तदेय सादर करावी

(स्वाक्षरी) १८.५.१८
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ फॅक्स-२६९०००७

E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**रजिस्टर एडी / ईमेल**

क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र/२०१८/१८८

दि. १६/०५/२०१८

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई /पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांच्या सन २०१७-१८ करिता तपासणीसाठी प्रलंबित अर्जासाठी उपाय योजना...

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/वि.का.पत्र/२०१८/१८१ दि. १०/०५/२०१८

उपरोक्त विषयांस अनुसरुन संदर्भीय पत्राद्वारे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता, संस्था व विभागीय स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित राहिलेल्या अर्जाबाबत खुलासा मागविण्यात आला आहे तो संचालनालयास अद्याप अप्राप्त आहे.

विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी, उपरोक्त विषयांकीत योजनांसाठी पुन्हा अर्जाच्या तपासणीची मुदत वाढवून देण्यात येत असून दि. २५/०५/२०१८ पर्यंत आपल्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांना कळवून, संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित राहिलेल्या अर्जाची तपासणी करुन अर्ज मंजुर / नामंजुर करुन घ्यावे. तसेच विभागीय स्तरांवर प्रलंबित राहीलेले अर्ज दि. २५/०५/२०१८ पर्यंत तपासणी करुन अर्ज मंजुर / नामंजुर करावे. तसेच संकेतस्थळावर नवीन अर्ज भरण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २५/०५/२०१८ नंतर जर कोणतेही अर्ज प्रलंबित राहिले तर ते रद्द करण्यात येतील व रद्द केलेल्या अर्जाची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय कार्यालयाची राहील हे आपल्या माहितीसाठी.

आपला,

(डॉ. अभय वाघ.)

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई.

प्रत कार्यासन क्र. ३ , आय.टी. सेल, मुख्य कार्यालय यांना माहितीसाठी व फक्त भरलेले अर्जाची तपासणी करण्याची लिंक उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच संस्थांना एसएमएस करुन अर्जाच्या तपासणीबाबत कळविण्यासाठी.

\\192.168.1.9\Desk18\Minority cell\Shaskiya patra\From 2017-18\RCSM\Letter to RO.doc



श्री शिंदे / श्री आगाडे

१८.५.१८